# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com  Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. परदेशी शिष्यवृत्ती/२०२१-२२/(७६६५/२१)/शिष्यवृत्ती/ ३८७६ दिनांक : १८.१०.२०२१

**परिपत्रक**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित/
टप्पा अनुदानित/कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेंतर्गत शिष्यवृत्ती निवडीसाठी सन २०२१-२२ करिता अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत...**

संदर्भ : - १. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८.

२. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६/तांशि-४, दिनांक ६ सप्टेंबर, २०२१.

३. तंत्र शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/६४ दि. २१ सप्टेंबर, २०२१.

४. प्रस्तुत कार्यालयाचे परिपत्रक दि. २२.०९.२०२१.

५. मा. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं-२०२१/परदेशी शिष्यवृत्ती योजना/१०९१९ दि. ६.१०.२०२१.

६. तंत्र शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/८७ दि. १८ ऑक्टोबर, २०२१.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि. ४.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागातील खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली आहे. सदर योजना संदर्भाधिन क्र. २ च्या दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये काही सुधारणांसह शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीताची सदर शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन पध्दतीने **अर्ज भरावयाचा असून सदर अर्ज भरण्यासाठीची अंतिम मुदत दिनांक १८ ऑक्टोबर, २०२१ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) होती. तथापि सदरची मुदत वाढवून, उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची मुदत दिनांक १ नोव्हेंबर, २०२१ अशी करण्यात येत आहे.**

**तरी आपणांस कळविण्यात येते की, अर्ज तपासणी व स्वीकृती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे या कार्यालयात दि. १ नोव्हेंबर, २०२१ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) या कालावधीमध्ये उपस्थित रहावे.**

**(डॉ. किरणकुमार बोंदर)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत - १. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.
२. डॉ. अभय वाघ, तंत्रशिक्षण संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३ महापालिका मार्ग, मुंबई ४००००१. यांना माहितीस्तव सादर.

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१९

ई-मेल–desk17@dtemaharashtra.gov.in. वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक :

क्रमांक : १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/८७ दिनांक : 18 OCT 2021

विषय : उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२१-२२ करिता शिष्यवृत्ती निवडीसाठी अर्ज स्विकृतीच्या मुदत वाढीबाबत...

संदर्भ : १) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६८/ तांशि-४ दिनांक ०६ सप्टेंबर, २०२१

२) संचालनालयाचे पत्र क्र. १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/६३ व ६४, दिनांक २१ सप्टेंबर, २०२१

दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली असून,संदर्भाधिन दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदरची योजना काही सुधारणांसह शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिताची जाहिरात दिनांक २१ सप्टेंबर, २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याबाबत आपणांस संदर्भाधिन क्र. २ च्या दिनांक २१ सप्टेंबर, २०२१ च्या पत्रान्वये कळविण्यांत आले होते की, सदर शिष्यवृत्तीसाठी online पद्धतीने अर्ज करावयाचे असून, उमेदवारांनी अर्ज करण्याची मुदत दिनांक १८ ऑक्टोबर, २०२१, सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत होती. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती विभागीय कार्यालयास मूळ कागदपत्रांवरुन पडताळणी करुन सादर करण्याची मुदत दिनांक २० ऑक्टोबर, २०२१, सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत आहे. तरी, सदरची मुदत वाढवून आता, उमेदवारांनी online पद्धतीने अर्ज करण्याची मुदत दिनांक १८ ऑक्टोबर, २०२१ वरुन दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२१ अशी करण्यांत येत आहे. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती संबंधित विभागीय कार्यालयास मूळ कागदपत्रांवरुन पडताळणी करुन सादर करण्याची मुदत दिनांक २० ऑक्टोबर, २०२१ वरुन दिनांक ०२ नोव्हेंबर, २०२१ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत करण्यांत आलेली आहे.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्र शिक्षण,
म.रा., मुंबई

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :

१) संचालक, उच्च शिक्षण पुणे
२) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
३) सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई/पुणे/जळगांव/नांदेड/पनवेल/कोल्हापूर/सोलापूर/नागपूर/ औरंगाबाद/अमरावती

D:\Desk-19\Mali\Foreign Scholarship-2021-22\Foreign Scholarship-letter.doc

## उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेंतर्गत सन २०२१-२२ करिता शिष्यवृत्ती निवडीसाठी अर्ज स्विकृतीचा सुधारित कार्यक्रम

| क्र. | कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरणे व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रे अर्जासोबत अपलोड करणे | दि. २१ सप्टेंबर २०२१ ते<br>दि. ०१ नोव्हेंबर २०२१<br>(सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत) |
| २ | • ज्या उमेदवारांनी कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी अर्ज केला आहे त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्याशी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, उच्च शिक्षण येथे<br>व<br>• ज्या उमेदवारांनी व्यवस्थापन, अभियांत्रिकी / वास्तुकलाशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी अर्ज केला आहे त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्याशी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, तंत्र शिक्षण येथे<br>वर नमूद केल्याप्रमाणे online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी सादर करावीत. | दि. २३ सप्टेंबर २०२१ ते<br>दि. ०२ नोव्हेंबर २०२१<br>(सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत) |